# प्रेस नोट दिनांक ०९/११/२०१७
# कामगार नेता कैलास कदम याचे खुनाचे कट रचणाऱ्या आरोपींवर मोका अंतर्गत कारवाई

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील आरोपी नामे १) काल्या उर्फ राजु महादेव पात्रे, रा.विद्यानगर, चिंचवड, पुणे २) संतोष मच्छिंद्र जगताप, रा. मोरवाडी, तुपेनगर, पिंपरी, चिंचवड, पुणे. ३) लुब्या उर्फ संतोष चिंतामण चांदिलकर, रा.लवळे, ता.मुळशी, जि.पुणे. हे दि. १०/४/२०१७ रोजी खंडाळा कोर्ट, जि. सातारा येथून परत येताना कात्रज घाटातून पळून गेल्याबाबत पोलीस पार्टीने रिपोर्ट दिल्याने प्रथम भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता.

त्यानंतर तपासात आरोपी हे पिंपरी पोलीस ठाणेचे हद्दीत मोरवाडी कोर्टाचे समोर, पिंपरी, पुणे येथून पोलीसांचे ताब्यातुन पळून गेल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन गुन्हा पिंपरी पोलीस ठाणे येथे वर्ग केला होता. त्यांनतर गुन्हे शाखा युनिट ४ ने आरोपी राजू उर्फ काल्या पात्रे यास पकडले असता, त्याचेकडून आरोपींना पळून जाण्याकरीता ॲड. मंचरकर व त्याचे साथीदारांनी मदत केल्याचे उघडकीस आले. आरोपीं लुब्या उर्फ संतोष चिंतामण चांदिलकर यास ॲड. मंचरकर याने कामगार नेते कैलास कदम याचे खुनाची सुपारी दिली असल्याचे तपासात उघड झाले. त्यानंतर गुन्हयाचे कटातील एकूण १३ आरोपी तसेच आरोपींचे पलयनास मदत करणारे ४ पोलीस यांना सुध्दा आरोपी करण्यात आले आहे.

सदरचा गुन्हा हा संघटितपणे केल्याचे निष्पन्न झाल्याने स.पो.नि. नितीन भोयर, गुन्हे शाखा,युनिट ४, पुणे शहर यांनी मा. अपर पोलीस आयुक्त तथा पोलीस उपमहानिरीक्षक, गुन्हे शाखा, पुणे श्री.प्रदीप देशपांडे यांचेकडे दाखल गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदयान्वये कारवाई करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यांनी आरोपींविरुध्द मोका अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश पारीत केले आहेत. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे २, श्री संजय निकम करीत आहेत.

या गुन्हयामध्ये पोलीस कर्मचारी जरी आरोपी असले तरी त्यांच्यावर सुध्दा इतर आरोपींप्रमाणेच कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त,रश्मि शुक्ला यांनी दिले होते.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री प्रदीप देशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री पंकज डहाणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२ श्री संजय निकम, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र तोडकर व सहा. पोलीस निरीक्षक श्री नितीन भोयर यांनी केलेली आहे.